साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपस्सना

साधक (मराठी)

**बुद्धवर्ष 2569, ज्येष्ठ पौर्णिमा, 14 जून, 2025, वर्ष 1 अंक 4** (संशोधित) 2017 पासून निरंतर प्रकाशित

वार्षिक सदस्यता शुल्क ₹ 100.00; (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50) प्रति अंक शुल्क ₹ 0.00

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहा: http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

### धम्मवाणी

**न अत्तहेतु न परस्स हेतु, न पुत्तमिच्छे न धनं न रट्ठं।**

**न इच्छेय्य अधम्मेन समिद्धिमत्तनो, स सीलवा पञ्ञवा धम्मिको सिया॥**

— *धम्मपदं, 84, पण्डितवग्गो*

जो आपल्या स्वत:साठी किंवा दुसऱ्यासाठी पुत्र, धन अथवा राज्याची कामना करीत नाही आणि अधर्माने आपली उन्नती करू इच्छित नाही, तो शीलवान, प्रज्ञावान आणि धार्मिक असतो.

## सम्राट अशोकाद्वारे सैन्याचे नि:शस्त्रीकरण?

*(आजच्या या कठीण काळात जेव्हा 'युद्ध' आमची सावली बनले आहे तेव्हा या विषयावर ऐतिहासिक साहित्यावर आधरित पूज्य गुरुजी श्री स. ना. गोयंकाजींचे विचार प्रस्तुत करीत आहोत. सं.)*

कलिंग-युद्धाच्या नंतर सम्राट अशोक भगवानांच्या शिकवणीचा वास्तविक अनुयायी बनला. पण तो सैन्याला आणि शस्त्रांना कसे त्यागू शकत होता? सैनिकांना भिक्षू कसे बनवू शकत होता (जसे की कित्येक लोक म्हणतात)? उलट भगवानांच्या शिकवणीनुसार त्याने अधिक प्रबळ सैन्य ठेवले, परंतु त्याचा उपयोग आपल्या देशाच्या आतल्या आणि बाहेरच्या सुरक्षेसाठी केला, ना की शेजारच्या देशांवर आक्रमण करण्यासाठी. त्याचे साम्राज्य अफगाणिस्तानपासून बंगालपर्यंत पसरले होते. इतके मोठे साम्राज्य याच्या आधी किंवा याच्यानंतर आजपर्यंत कोणत्याही भारतीय सम्राटाचे झाले नाही. या विशाल उप-महाद्वीपाला सुरक्षित ठेवण्यासाठी त्याने पर्याप्त संख्येत शक्तिशाली सशस्त्र सैन्य देशाच्या सीमांवर तैनात करून ठेवले होते. कलिंग-युद्धानंतर त्याने आपणहून कोणत्या देशावर आक्रमण केले नाही, परंतु आपल्या देशाची अखंडता आणि स्वतंत्रता पूर्ण रूपाने कायम ठेवली. कलिंग-युद्धानंतर मृत्यूपर्यंत तो 29 वर्षे राज्य करीत राहिला. इतक्या दीर्घ काळापर्यंत कोणी विदेशी शत्रू देशाची एक इंचही भूमी घेऊ शकला नाही. कोणी आक्रमण करण्याचे दुस्साहसही केले नाही. सम्राट अशोकने देशाच्या स्वतंत्रतेवर जराशीही आच येऊ दिली नाही. सैन्याला भिक्षू बनवण्याने काय हे शक्य होते? काय सैन्याचे नि:शस्त्रीकरण करण्याने हे शक्य होते? आपण इतका तर विचार करावा की ज्या कलिंगवर इतका अत्याचार झाला, त्याच्यानंतर लगेचच सेनेला भिक्षू बनविल्यावर काय कलिंग देशवासियांच्या मनात प्रतिशोधाची आग भडकून उठली नसती? काय त्यांनी बंड पुकारले नसते? इतक्या मोठ्या साम्राज्यात इतरत्रही अराजकता पसरली नसती?

भगवान बुद्ध स्वतंत्रता-प्रेमी होते. त्यांचा परम श्रद्धाळू अनुयायी अशोक देशाच्या स्वतंत्रतेला अक्षुण्ण कसे ठेवणार नाही? आपल्या प्रजेला सुरक्षित कसे ठेवणार नाही? भगवान बुद्ध राज्याच्या रक्षणाचे प्रबळ समर्थक होते. पराधीनतेला ते वाईट मानत होते. भगवान बुद्ध देशाच्या सुरक्षिततेला खूप महत्व देत होते. त्यांनी आपल्या उपदेशांमध्ये खूप स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की पराधीन कधी सुखी होऊ शकत नाही. स्वाधीनच सुखी राहतो.

**नाञ्ञस्स पुरिसो सिया–** कोणा दुसऱ्याचे गुलाम होऊन राहू नये.

**नाञ्ञं निस्साय जीवेय्या–** कोणा दुसऱ्यावर आश्रित होऊन जगू नये.

– *उदान 52, सत्तजटिलसुत्तं*

याकरीता भगवान बुद्धांनी आपल्या जीवन-काळात कोणत्या राजाला कधी आपले सैन्य कमी करण्यासाठी किंवा युद्ध रोखण्यासाठी सांगितले नाही, उलट गरज पडल्यास त्याचे समर्थनच केले जसे–

## बुद्धानुयायी शासकांचे युद्ध-अभियान

### मगध राजकुमार अभय

बिंबिसारचे राज्य पश्चिमेला काशी आणि पूर्वेला अंगपर्यंत पसरले होते. पश्चिमेला कोशल नरेश प्रसेनजितशी त्याचे मधुर पारिवारिक संबंध होते. त्याच्या बहिणीचा विवाह प्रसेनजितशी झाला होता आणि प्रसेनजितच्या बहिणीचा विवाह बिंबिसारशी. या संबंधांमुळे त्याच्या राज्याची पश्चिमी सीमा सुरक्षित होती, परंतु पूर्व सीमेवर शेजारच्या राज्यांचे छोटे-मोठे हल्ले आणि चकमकी होत असत. बिंबिसारला या पूर्व राज्य-सीमेच्या सुरक्षेसाठी तिथे नेहमी सैन्य ठेवावे लागत असे. इतकेच नाही तर वेळोवेळी आवश्यकता पडल्यास राजधानी राजगृहातून अतिरिक्त सैन्यही पाठवावे लागत असे. हे ऐतिहासिक तथ्य आहे की एकदा शत्रूंशी लढण्यासाठी जे सैन्य राजधानीतून पाठवले गेले त्याचे नेतृत्व बिंबिसारचा पुत्र अभय राजकुमारने केले. या युद्धात जिंकून आल्यावर बिंबिसारने आपल्या पुत्राच्या विजयावर आनंदोत्सव साजरा केला आणि सात दिवसांकरीता त्याला राज्यगादीवर बसवले. हे भगवान बुद्धांच्या उपस्थितीत आणि त्यांच्या जाणकारीत घडले. त्यांनी याचा थोडासाही विरोध केला नाही. स्पष्ट आहे की ते राज्याच्या सुरक्षेचे प्रबळ समर्थक होते– मग भले ते गणतंत्रीय लिच्छवी राज्य असो, किंवा एकतंत्रीय मगधराज्य, किंवा कोशलराज्य.

– *धम्मपद अट्ठकथा 2.170-171, अभय राजकुमारवत्थु*

## कोशलनरेश प्रसेनजित

कोशलनरेशद्वारेही आपल्या राज्याच्या सुरक्षेप्रति सजग राहण्याचे तथ्य आमच्या समोर आहे. त्याच्या राज्याचीही पूर्व सीमा जवळपास सुरक्षित होती, परंतु पश्चिमी राज्य-सीमेवर शेजारच्या शत्रुंचे हल्ले होतच रहायचे. याच्या सुरक्षेसाठी त्याचे प्रबळ सैन्यदल नेहमी तैनात राहत असे. राज्याच्या सुरक्षेसाठी राजधानी श्रावस्तीपासून सेनेचे नेतृत्व करत प्रसेनजित स्वत:ही कधी-कधी सीमेवर युद्ध लढायला जात असे. राज्याच्या रक्षणासाठी लढली गेलेली अशी युद्धे भगवान बुद्धांपासून अज्ञात नव्हती. काही प्रसंग असेही आहेत की युद्धाकरीता जाताना प्रसेनजित आपल्या सेनेसहित जेव्हा जेतवन विहाराच्या समोरून जायचा तेव्हा तो जेतवनाच्या द्वारावर सेनेला थांबवून स्वत: भगवानांना भेटायला जायचा आणि नमस्कार करून त्यांना युद्ध-यात्रेची सूचना द्यायचा. एकदा अशाच एका प्रसंगी भगवान स्मित करत विचारतात की आज कोणाशी युद्ध करायला जात आहात? बिंबिसारशी? का लिच्छवींशी? का कोणा अन्य शत्रूंशी?

*– मज्झिमनिकाय 2.350, अङ्गुलिमालसुत्तं*

प्रसेनजित जेव्हा युद्ध जिंकून परतत असे तेव्हाही तो जेतवन विहाराच्या समोरून जाताना सेनेला बाहेर थांबवून भगवानांना नमस्कार करण्यासाठी आणि शत्रूला पराजित केल्याची सूचना देण्यासाठी तसेच आपली प्रसन्नता प्रकट करण्यासाठी त्यांना पुन्हा भेटत असे. तो भगवानांचा अनन्य भक्त होता. युद्धासाठी जातेवेळी नेहमी भगवानांना भेटून त्यांना नमस्कार करीत असे, तेव्हाही भगवान त्याला असा प्रश्न करीत असत की यावेळी कोणाशी युद्ध करायला जात आहात? जर त्याला जरासेही भान असते की भगवान सशस्त्र सेना ठेवण्यासाठी आणि देशाच्या सुरक्षेसाठीही तिला युद्धात जुंपण्याच्या विरोधी आहेत तर प्रसेनजितने आपली सेना बरखास्त केली असती. असे जरी केले नसते आणि सीमेवर युद्ध करण्यासाठी सैन्य पाठवले असते किंवा स्वत: सैन्याचे नेतृत्व करत सीमेकडे गेला असता तर जाताना किंवा जिंकून परतताना कोणत्या तोंडाने भगवानांना भेटला असता? स्पष्ट आहे की भगवान राज्याच्या सुरक्षेसाठी सैन्यबळाच्या प्रयोगाचे समर्थक होते, तेव्हाच तर युद्धाला जाते वेळी आणि जिंकून परततेवेळी राजा प्रसेनजित भगवानांना नमस्कार करीत असे.

*– अङ्गुत्तरनिकाय 3.10.30, दुतियकोसलसुत्तं*

## सम्राट अशोकाचे आतंकवाद आणि सरहद्दीवरील आक्रमणांपासून निपटण्याचे उपाय

भगवान बुद्धांनी बाहेरील आक्रमणाचा सामना करण्यासाठी लिच्छवी गणतंत्राला जो सप्तांगिक उपदेश दिला होता तो सम्राट अशोकला विदित होता. गणतंत्राला देण्यात आलेल्या उपदेशांमधून पहिले दोन उपदेश हे होते की सरहद्दीवर युद्धाचे ढग घिरट्या घालताना दिसू लागताच सर्व संसद-सदस्यांनी गणराज्याच्या संस्थागारा(संसद-भवना)त त्वरीत एकत्र यावे आणि एक-मत तसेच एक-जुट होऊन देशाच्या रक्षणासाठी तयार रहावे. गणतंत्र असल्यामुळे अनेक अंतर्गत मुद्द्यांवर मतभेद होऊ शकतात, विवाद होऊ शकतात– परंतु जर देशाची स्वतंत्रता धोक्यात येत असेल तर सारे मतभेद विसरून एकमात्र मुद्दा देशाला वाचविण्याचाच असला पाहिजे आणि त्यात सर्वांनी एक-मत, एक-जुट होऊन शत्रूचा सामना करण्यास सज्ज राहिले पाहिजे.

अशोक सर्व-समर्थ सम्राट होता. त्यामुळे उर्वरीत पाच उपदेशांचे पूर्णपणे पालन करीत होता, परंतु पहिले दोन त्याच्यावर लागू होत नव्हते. बाहेरचा हमला झाल्यावर देशाच्या रक्षणासाठी तो स्वत: निर्णय घेत असे. गरज असेल तेव्हा कोणाला बोलावून त्याच्याकडून सल्ला घेत असे तरीही त्याने सल्ला-मसलत करण्यासाठी एका परिषदेचीही स्थापना केली होती.

भगवान बुद्धांनी एकतंत्रीय राजासाठी बाहेरील आक्रमणापासून प्रजेला सुरक्षित ठेवण्याचे जे महत्त्वपूर्ण विवरण दिले, सम्राट अशोकने त्याचे तंतोतंत पालन केले.

भगवान बुद्धांद्वारे एका चक्रवर्ती सम्राटाचे जे विवरण दिले गेले अशोक त्याच्याशी अवगत होता. भले अशोक आपल्या स्वत:ला चक्रवर्ती सम्राट म्हणत नसे, तो तर सम्राटही म्हणत नसे, इथपर्यंत की महाराजाही म्हणत नसे. आपल्यासाठी केवळ "राजा" शब्दाचा उपयोग करीत असे. हे त्याच्या असीम विनम्रतेचे परिचायक होते. तसे त्याचे राज्य एका चक्रवर्ती सम्राटाच्या राज्याप्रमाणे सागराच्या एका तटापासून दुसऱ्या तटापर्यंत संपूर्ण भूमीवर पसरलेले होते. पूर्वेकडे बंग सागराचा तट आणि पश्चिमेकडे सिंधू-सागरा (अरबी सागरा)चा तट. तो एका चक्रवर्ती राजाप्रमाणे *अदण्डेन असत्थेन,* कोणत्याही दंडा (अस्त्रा)विना किंवा शस्त्राच्या विना अविजित देशांना धर्माने जिंकतो म्हणून शेजारील देश त्याला *"द्वीपचक्कवत्ती"* (द्वीप चक्रवर्ती), म्हणजे, जंबुद्वीपाचा चक्रवर्ती राजा म्हणू लागले होते.

भगवानांनी सांगितले होते की एका चक्रवर्ती राजाकडे बलवान चतुरंगिणी सेना असते आणि त्याचे बलवान राजपुत्र असतात. जेव्हा तो शस्त्रांद्वारे युद्ध करून कोणाला जिंकणारच नाही तर हा सर्व थाट-माट कशासाठी? स्पष्ट आहे की हे प्रजेच्या रक्षणासाठी आवश्यक आहे. तो आपल्या देशाचे आणि प्रजेचे रक्षण करतो.

*– अङ्गुत्तरनिकाय, 2.5.133, धम्मराजासुत्तं*

भगवान या सुत्तात स्पष्ट संकेत देतात की तो(चक्रवर्ती राजा)आपल्या राज्यातील गावांचे-नगरांचे-जनपदांचे रक्षण करतो आणि तिथल्या सर्व जातींच्या निवासींचेही रक्षण करतो.

याच प्रसंगात अजून एक गोष्ट उल्लेखनीय आहे की चक्रवर्ती राजा आपल्या सैन्याचेही रक्षण करतो. जर सैन्यच ठेवले नाही तर त्याचे रक्षण काय करेल भले? उद्देश स्पष्ट आहे त्याने सैन्याची संख्या घटवली किंवा अत्याधुनिक शस्त्रास्त्रे दिली नाहीत तर कोणताही दुष्ट शेजारी आपल्या बलवान सैन्याने या कमजोर सेनेला नष्ट करून टाकेल. त्यामुळे आपल्या सैन्याला सुरक्षित ठेवण्यासाठी एक चक्रवर्ती राजा त्याला इतरांपेक्षा अधिक संख्येने ठेवतो आणि त्याला आधुनिकतम शस्त्रास्त्रांनी सुसज्जित ठेवून खऱ्या अर्थाने त्याची उचित सुरक्षा करतो की ज्यामुळे बलवान सेनेच्या बाहेरील आक्रमणापासून देशाची सुरक्षा होऊ शकेल. शेजारच्या देशांनी अशोकाद्वारे पाठवलेल्या बुद्धांच्या शिकवणीचे जसेच्या तसे पालन केले. त्यांनी ना आपली सेना बरखास्त केली आणि ना त्यांची शस्त्रे उतरवली तेव्हा अशोकने स्वत: बुद्धांच्या शिकवणीचे पालन केले नसेल, हे कथन किती हास्यास्पद आहे.

सत्यता ही आहे की अशोकाद्वारे सीमांत प्रदेशात बनवले गेलेले सुदृढ़ किल्ले आणि त्यात तैनात असलेली विशाल चतुरंगिणी सेना पाहून शेजारील राज्ये भयभीत होत असत. ते जाणत होते की अशोकाची सैन्यशक्ती किती प्रबळ आहे आणि आत्ताही आपल्या फौजी ताकदीच्या बळावर तो पाहिजे तेव्हा आपल्याला गिळंकृत करू शकतो.

## सम्राट अशोकचा शिवसंकल्प

शेजारील देशांवर आक्रमण न करण्याच्या त्याच्या शिवसंकल्पानेच शेजाऱ्यांबरोबर चांगले संबंध स्थापित होण्याचा श्रीगणेशा झाला आणि मग त्याने शेजारील देशांची अनेक प्रकारे सहायता करणे सुरू केले. जसे आपल्या

राज्यात, तसेच शेजारच्या देशांमध्येही यात्रींच्या सुविधेकरीता रस्त्यांवर छायादार व फळदार वृक्ष लावले. मनुष्यांसाठी आणि पशूंसाठी आवश्यक औषधी रोपे-वनस्पती लावल्या तसेच ठिक-ठिकाणी यात्रींच्या सुविधेसाठी विहिरी खोदल्या, पाणपोया उघडल्या. त्याने जसे आपल्या राज्यात तसेच इतर राज्यातही केवळ मनुष्यांसाठीच नाही तर पशूंसाठीही औषधालये उघडली. अत्यंत समृद्ध आणि उदार भारताची आपल्या शेजारील देशांकरीता ही अत्यंत महत्वपूर्ण भेट होती. सक्रिय सद्भावना होती.

इतकेच नाही तर, आता तो शेजारच्यांना जिंकतो पण युद्धाने नाही, धर्माने जिंकतो. म्हणजे, त्याने आपल्या साम्राज्यात ज्या धर्मराज्याची स्थापना केली, शेजारच्यांनाही त्यासाठी सल्ला देतो. त्याच प्रकारच्या शासन-तंत्र-प्रणालीच्या आणि आदर्श न्यायपालिकांच्या स्थापनेचा सल्ला देतो की ज्याचे तो स्वत: पालन करतो. अनेकांनी त्याच्या शासन-नीतीचे सहर्ष अनुकरण केले.

त्याने अनेक शेजारी देशांमध्ये धर्मदूत पाठवले की जे धर्माची शिकवण घेऊन गेले, भगवान बुद्धांची संपूर्ण वाणी घेऊन गेले आणि त्याच्याबरोबरच कल्याणी विपश्यना विद्या घेऊन गेले, जिला त्या देशांनी सहर्ष स्वीकारले. यात भारताचा कोणता स्वार्थ नव्हता. श्रीरामाद्वारे लंकेला जिंकण्याचे उदाहरण आमच्या समोर आहे. लंकेला जिंकून, तिच्यावर राज्य करण्यासाठी अयोध्येतून तिथे कोणता व्हॉइसरॉय नाही पाठविला गेला. तिथल्या लोकांचे राजनैतिक किंवा आर्थिक शोषण नाही केले गेले. तिथल्याच एका योग्य व्यक्तीकडे ते राज्य सोपवण्यात आले जेणेकरून तिथले लोक कोणा परक्या शोषणाने उत्पीडीत होणार नाहीत.

भारताचा हा एक प्राचीन उच्च आदर्श राहिला ज्याला भगवान बुद्धांनी चक्रवर्ती सम्राटाच्या उदाहरणस्वरूपाने लोकांसमोर ठेवले. अशोकने त्याचेच अनुकरण केले. त्याने शेजारी देशांवर धर्ममयी विजय प्राप्त केला. याच्याने तिथे अशोकाचे किंवा भारताचे साम्राज्य स्थापित नाही झाले, परंतु तरीही त्याने लोकांची हृदये जिंकली. तिथल्या लोकांचा हृदय-सम्राट बनला. हे केवळ त्याच्या आपल्या जीवन-काळापर्यंतच सीमित राहिले नाही, तर सहस्रावधी वर्षांनंतर आजही या शेजारी देशांचे लोक अशोकला एक आदर्श राजा मानतात आणि त्याने जी धर्माची शिकवण त्यांना पाठवली, याकरीता त्याचे असीम उपकार मानतात. मी पाहिले आहे की बर्माचे गृहस्थ सकाळी-सकाळी मंगल कामनेचा पाठ करतात तेव्हा म्हणतात–

**देवो वस्सतु कालेन, सस्ससम्पत्ति हेतु च।**
**फीतो भवतु लोको च, राजा भवतु धम्मिको॥**

म्हणजे, चांगल्या धन-धान्यासाठी वेळेवर पाऊस पडो, देशात समृद्धी येवो आणि देशाचा राजा धार्मिक बनो.

जेव्हा ते म्हणतात की देशाचा राजा धार्मिक बनो तेव्हा अशोकाच्या धर्मराज्याचा आदर्श त्यांच्या मनात असतो. त्यांना वाटते की आमच्या देशाचा राजाही अशोकासारखा धार्मिक असावा.

ते कामना करतात की त्यांच्या राजानेही त्या धर्मराजाच्या आदर्शांचे पालन करावे. तेव्हाच नित्य पाठ करतात–

**यथा रक्खिंसु पोराणो, सुराजानो तथेविमं।**

म्हणजे, ज्या प्रकारे जुन्या राजांनी आपल्या प्रजेचे रक्षण केले. (इथे जे जुन्या राजांकडे लक्ष वेधले आहे ते सम्राट अशोक तसेच त्याच्यासारखे आणखीही जे धर्मराजे झाले त्यांच्याकडे आहे.)

**राजा रक्खतु धम्मेन, अत्तनोव पजंपजं॥**

*– अट्ठकथा, संगायनस्स पुच्छा-विस्सज्जना 1.311 (म्यंमा)*

आमच्या राजानेही आपल्या प्रजेचे रक्षण तसेच करावे जसे की तो आपल्या संततीचे करतो.

हा होता अशोकाचा धर्म-विजय की जो वास्तविकपणे भारत-भूमीचा विजय सिद्ध झाला. भारताने या विजयामुळे शेजारच्या देशांची पिळवणूक केली नाही, त्यांचा गैरफायदा घेतला नाही, त्यांना गुलाम नाही बनवले. तरीही त्यांच्या हृदयावर एक अशी मनोहर छाप सोडली की ज्यामुळे पिढ्यानुपिढ्या अनेक शतकांपर्यंत त्यांच्या हृदयात भारताची महानता स्थापित झाली. त्या देशांमधून प्रत्येक वर्षी लाखोंच्या संख्येने लोक भारत आणि नेपाळच्या धरतीला नमस्कार करण्यासाठी येत राहिलेत, आजही येतात, भविष्यातही येत राहतील.

हा धर्माद्वारे प्राप्त विजय होता, ना की शस्त्रांद्वारे. धर्माचा विजय चिरायू असतो जेव्हा की शस्त्रांचा विजय अल्पायु. धर्मविजयाने विजेता आणि विजित दोन्ही प्रसन्न होतात, दोन्ही संतुष्ट होतात. तेव्हाच अशोकने आपल्या एका शिलालेखात हे भाव प्रकट केले–

धर्माद्वारे विजय प्राप्त केल्याने मला तृप्ती मिळाली आहे.

जी धर्मरती आहे ती पूर्णपणे अतीरती आहे.

म्हणजे, या लोक-कल्याणकारी विजयात जो आनंद आहे तो संपूर्ण आनंद आहे, अत्यानंद आहे.

## शाहबाजगढीचा तेरावा शिलालेख

हा होता भगवान बुद्धांच्या परम अनुयायी महान अशोकाचा धर्मविजय! हा होता महान भारताचा धर्मविजय!

असा विजय ज्यात विजेताही जिंकला आणि विजितही! हरले कोणी नाही! सर्वांचा विजय झाला!

अनेक शतकांच्या गुलामीनंतर देश जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा स्वतंत्र भारताने धर्मराज अशोकच्या याच गौरवमयी धर्मविजयाची आठवण ताजी करत राष्ट्राच्या ध्वजावर 'अशोकचक्र' अंकित करून त्याला आकाशात फडकवले. धर्मराजाच्या चतुर्मुखी सिंहांचा राजचिन्हाच्या रुपात स्वीकार करून त्याचा समुचित सन्मान केला आणि शेजारील देशांना आल्हादित केले. भारताचा पुरातन गौरव त्याला पुन्हा प्राप्त होवो! भारत पुन्हा साऱ्या विश्वाच्या लोकांचा हृदय-सम्राट बनो!

कल्याणमित्र,

सत्यनारायण गोयंका

(विश्व विपश्यनाचार्य पूज्य श्री गोयंकाजींच्या 'राजधर्म' या पुस्तकातून साभार)

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. श्री दत्तात्रय राऊत, धम्म वसुधा विपश्यना केंद्र वर्धा च्या केंद्र-आचार्यांची सहायता

### नवीन उत्तरदायित्व

#### आचार्य

1. श्रीमती कमलताई आर. गवई, अमरावती

#### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्री प्रकाश चांदेकर, नागपूर
2. श्री राहुल तेलंग, नागपूर
3-4. श्री राजाभाऊ व श्रीमती प्रमिला राऊत, वाशिम
5. श्रीमती ऊषा तायडे, अकोला
6. श्रीमती माला मंडल, कोलकाता

### नव नियुक्त

#### सहायक आचार्य

1-2. श्री अजय चोपड़ा व श्रीमती छवि त्रिवेदी, इगतपुरी
3. श्री चंद्रकांत वाघमारे, पुणे
4. Mrs. Xinhua HE, China
5. Mrs. Zhi Juan Chen, China
6. Ms. Severine Mons, Australia

## निर्माणाधीन विपश्यना केंद्र "धम्म सुधाकर"

उत्तर प्रदेशच्या जिल्हा हाथरस, तहसील सिकंदराराऊ च्या मथुरापूर गावात बुद्ध पौर्णिमा, सोमवार दिनांक 12 मे 2025 रोजी नवीन विपश्यना ध्यान केंद्र "धम्म सुधाकर"च्या निर्माणकार्याचा शुभारंभ झाला आहे.

इथे जवळपास 100 साधक-साधिकांसाठी ध्यान केंद्राचे निर्माणकार्य चार चरणांमध्ये होईल. प्रथम चरणात साधारणपणे 30 ते 40 साधक-साधिकांसाठी निवास-स्थान, शिबिर कार्यालय, भोजनालय, छोटा धम्मकक्ष, आवश्यक रस्ते तसेच जनसुविधांची योजना आहे.

केंद्राचा पूर्ण पत्ता: धम्म सुधाकर विपश्यना केंद्र, ग्राम- मथुरापूर, पोस्ट हसायन, तहसील सिकंदराराव, जिल्हा हाथरस, उत्तर प्रदेश – 204 212.

**ईमेल:** dhammasudhakara@gmail.com;

**संपर्क नंबर:** मेरठ विपश्यना संस्थान,मेरठ +917505414181, +919555515548, +919837035642

बँक विवरण: मेरठ विपश्यना संस्थान, इंडियन बँक, मेरठ शाखा, Account No. 6575615053, IFSC Code: IDIB000M685, PAN:AAATM9958M

आपणही दान पारमीच्या या स्वर्णिम संधीचा लाभ घेऊ शकता. मेरठ विपश्यना संस्थान, मेरठला 80G आयकराची सुविधा प्राप्त आहे. कृपया दानाची रिसीट प्राप्त करण्यासाठी दान-विवरण वरील नंबरवर अथवा ईमेलवर अवश्य पाठवावे.

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

**एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः**

1. **रविवार**- 13 जुलै, 2025 आषाढ-पौर्णिमे (धम्मचक्कपवत्तन दिवस) च्या निमित्ताने.
2. **रविवार** 5 ऑक्टोबर, 2025 पूज्य गोयंकाजींच्या पुण्यतिथी (29 सप्टेंबर 2013) च्या निमित्ताने.
3. **रविवार 18** जानेवारी 2026 ला माताजींच्या पुण्य-तिथि (5 जानेवारी 2016) व सयाजी ऊ बा खिन यांची पुण्य-तिथि (19-1-1971)च्या निमित्ताने **एक दिवसीय** महाशिबिर होतील.

**2. एक दिवसीय शिबिर दररोज**

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडा मध्ये दररोज एक दिवसीय शिबिर आयोजित केली जात आहे. कृपया सामील होण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करावा. आणि एक मोठ्या सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. *समग्गानं तपोसुखो ।* **सर्वांसाठी संपर्क: 022 50427500 (Board Lines)** - Extn. no. 9, मो. **+91 8291894644.** (दररोज 11 ते 5 वाजेपर्यंत)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register; Email: oneday@globalpagoda.org

**3. 'धम्मालय' विश्राम गृह**

एक दिवसीय महाशिबिरासाठी आल्यावर रात्री **'धम्मालय'** मध्ये विश्रांतीसाठी सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी आणि (बुकिंग) नोंदणीसाठी **संपर्कः** 022 50427599 or Email- *info.dhammalaya@globalpagoda.org or info@globalpagoda.org*

## दोहे धर्माचे

युद्ध भूमी योद्धा तपे, सूर्य तपे आकाश।
तापस अंतरी च तपे, करी दुःखाचा नाश॥
रण सहस्त्र योद्धा लढे, जिंके युद्ध हजार।
पण जो जिंके स्वतःला, तोच शूर सरदार॥
मनाच्या युद्ध भूमीत, करी सतत संग्राम।
अशा जागृत संताला, आराम रे हराम॥
समय खूप अनमोल रे, समय खूप बलवान।
विना प्रमाद तप करी, मिळे रे पद निर्वाण॥

## दोहे धर्माचे

दुर्जनतेचा कर द्वेष, प्रेम दुर्जनाशी कर।
आपल्यातील प्रेमाने, दुर्जन चित्त सुधार॥
द्वेष, द्रोह अन् वैराने, बैचेन-व्याकुळ होय।
प्रेमाने अन् स्नेहाने, पुलकित पुलकित होय॥
जागे द्वेषाने द्वेष च, प्रेमाने रे प्रीत।
संशयाने शंका रे, हीच जगाची रीत॥
इतरांच्या सुख-दुःखाला, आपलेच रे जाण।
त्यांच्यात समरस होई, खरा संत सुजाण॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2569, ज्येष्ठ पौर्णिमा 14 जून, 2025, वर्ष 1 अंक 4

वार्षिक सदस्यता शुल्क ₹ 100.00, (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50,) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK 286/2024-2026 **प्रति अंक शुल्क ₹ 0.00**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) (किरकोळ विक्री होत नाही)

**DATE OF PRINTING: 10 June, 2025, DATE OF PUBLICATION: 14 June, 2025**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org